Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020: कौशल्य विकसन आणि आव्हाने

**डॉ. के. एस. खैरनार**, सहयोगी प्राध्यापक, अॅड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गंगापूर रोड, नाशिक.

**सारांश :**

डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली तयार झालेले नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भविष्यकाळाचा वेध घेणारे शिक्षणक्षेत्रातील प्रभावी असे शैक्षणिक धोरण आहे. या शैक्षणिक धोरणाचा आकृतीबंध 5+3+3+4 असा असून शिक्षणाद्वारे कौशल्य निगडित रोजगारक्षम कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे हा आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाद्वारे विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण मिळून त्यांना कौशल्य विकसनाची संधी मिळणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची अंमलबजावणी करण्यासाठी अनेक आव्हाने उभी आहेत. ही आव्हाने पेलण्याची इच्छाशक्ती असेल तर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट निश्चितपणे साध्य होईल यात शंका नाही.

**प्रस्तावना**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 म्हणजे डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली सुचविण्यात आलेले शैक्षणिक क्षेत्रातील अमुलाग्र असे बदल होय. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भविष्यकाळाचा वेध घेणारे प्रभावी असे शैक्षणिक धोरण आहे म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे क्रांती नसून उत्क्रांती आहे. आत्मनिर्भर भारत निर्माण करण्यासाठी,नवनिर्माण समाज तयार करण्यासाठी टाकलेले दमदार पाऊल म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 होय. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षणाचा आकृतीबंध 5+3+3+4 असा आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण भारताच्या शैक्षणिक व्यवस्थेसाठी एक महत्त्वपूर्ण टर्निंग पॉईंट आहे. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय शिक्षण प्रणालीची सर्वसमावेशकता, अनुकूलता, व्यवसायिकता, कौशल्य विकसनता प्रकर्षाने दिसून येते.

राष्ट्राचे भवितव्य (भविष्य) शिक्षणाच्या धोरणावर अवलंबून असते. राष्ट्रासाठी शैक्षणिक धोरण हे राष्ट्राच्या भविष्यासाठी विकासाचा एक मार्ग असतो त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भविष्याचा वेध असला पाहिजे. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणाचे स्वरूप कसे असणार आहे, विद्यार्थ्यांसाठी कोणत्या संधी उपलब्ध होतील, अभ्यासक्रमाचे स्वरूप कसे असेल, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसन कसे साधता येईल, धोरण राबवताना शासनाकडून आव्हाने कोणती असणार या बाबी महत्त्वपूर्ण आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ज्येष्ठ वैज्ञानिक डी. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली तयार झाले. शिक्षणाच्या माध्यमातून कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे,कौशल्यांशी निगडित तसेच रोजगारक्षम अभ्यासक्रम तयार व्हावा, जागतिक पातळीवरील गुणवत्तापूर्ण शिक्षण, समाजातील सर्व घटकांना मिळावे या दृष्टिकोनातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची रचना झालेली दिसून येते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्पष्ट केलेले आहे की 2 ते 8 वयोगटातील मुले विविध भाषा जलद गतीने शिकतील. बहुभाषा कौशल्य मुलांच्या ज्ञानात्मक, भावात्मक, क्रियात्मक आकलनासाठी महत्त्वपूर्ण ठरते. आधुनिक कालखंडात विद्यार्थ्यांना गरजेनुसार शिक्षण मिळावे, विद्यार्थ्यांचा चिकित्सक दृष्टिकोन वाढवणे, अनुभवातून शिक्षण प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक


Copyright © | JET Network, All Rights Reserved

म्हणजे सर्वांगीण विकास करणे हा अभ्यासक्रम प्रक्रियेचा उद्देश असला पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये वरील बाबींचा विचार करण्यात आलेला दिसून येतो त्यामुळे शैक्षणिक विकासाला गती मिळते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये 5+3+3+4 आकृतीबंधात मोठ्याप्रमाणात संक्रमण दिसून येते. या शैक्षणिक आकृतीबंधात प्रत्येक शैक्षणिक स्तरावर मूलभूत कौशल्य आणि जीवन कौशल्य यावर भर दिलेला दिसून येतो. सन 2023 - 24 या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील विद्यापीठांमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यामुळे कौशल्याधिष्ठित शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना निश्चितपणे नोकरी मिळेल. कौशल्याधिष्ठित शिक्षणामुळे विविध क्षेत्राला कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्यास मदत होईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना कौशल्य विकसनाचे धडे दिले जाऊन त्यांच्या ज्ञानाचा उपयोग देश विकासासाठी करण्यात येईल. भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे हे नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे आनंददायी करण्याबरोबरच रोजगाराभिमुख तसेच जीवनाभिमुख करण्यावर प्रामुख्याने भर देण्यात आलेला आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण चांगले करण्यासाठी मातृभाषेला महत्त्व देणे, परीक्षा पद्धतीत बदल करणे, प्रभावी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमावर भर देणे, शिक्षकांच्या पात्रतेची कडक अंमलबजावणी करणे, उच्च शिक्षण क्षेत्राचे आंतरराष्ट्रीयकरण करणे यासारख्या बाबींचा समावेश केलेला दिसून येतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये कौशल्य विकसना बरोबरच व्यावसायिक शिक्षण तसेच तांत्रिक शिक्षण यावर भर दिलेला दिसतो. थोडक्यात आपण असे म्हणू शकतो की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये नव्या काळाच्या बदलाची गरज ओळखलेली दिसून येते.

विद्यार्थ्यांना जीवनाभिमुख शिक्षण मिळून रोजगाराला चालना मिळावी या व्यापक उद्देशाने नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भर दिलेला दिसून येतो त्यासाठी विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांच्या शिक्षणादरम्यान त्यांच्याशी निगडित कौशल्य विकसनासाठी संधी उपलब्ध होणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये व्यावसायिक शिक्षणावर भर दिलेला आहे कारण शिक्षणाद्वारे जागतिक आव्हानांना आत्मविश्वासपूर्वक सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक क्षमता निर्माण व्हावी त्यामुळे देश प्रगतीकडे वाटचाल करून कौशल्य आत्मसात करील. यासाठी विद्यार्थी देखील नाविन्यपूर्ण व प्रभावी असे शिक्षण घेण्यास प्रेरित होतील. नाविन्यपूर्ण शिक्षणामुळे, कार्यपद्धतीमुळे, विकसित तंत्रज्ञानामुळे, कौशल्य विकसनामुळे भविष्यकाळात अनेक फायदे मिळण्यास मदत होईल.

**नवीन शैक्षणिक धोरणापुढील आव्हाने:**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे 21 व्या शतकातील भविष्याचा वेध घेणारे दूरदर्शी शैक्षणिक धोरण आहे. या धोरणाद्वारे देशातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतांचा योग्य वापर, कौशल्य विकसन, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, अभ्यासक्रम रचनेतील बदल दिसून येणार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील ध्येये आणि दृष्टीकोन याबाबत विविध घटकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी सरकारमार्फत प्रयत्न केले जात आहे.

भारतात नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने सध्या जोर धरलेला दिसून येत आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पूर्णत्वासाठी अनेक आव्हाने दिसून येतात.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**1) उच्च शिक्षणाची व्यापकता :**

भारतात उच्च शिक्षणाची व्यापकता फार मोठी आहे. भारतात शेकडो विद्यापीठे, हजारो महाविद्यालये, हजारो स्वायत्त संस्था, त्यामध्ये शिक्षण घेणारे करोडो विद्यार्थी आहेत. या सर्वांना एकत्र आणून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे कठीण काम आहे. यासाठी जिल्हा स्तर, राज्य पातळीवर जबाबदारीची भावना निर्माण करणे हे मोठे आव्हान असणार आहे.

**2) राज्य पातळी व केंद्र पातळीवरील क्षमता :**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी राज्य पातळी व केंद्र पातळीवरील शासनाच्या क्षमतेवर अवलंबून आहे. भारत हा विकसनशील देश असल्यामुळे शिक्षणात निधीची कमतरता दिसून येते. शिक्षणव्यवस्थेत अनुकूल वातावरणाचा अभाव असल्या कारणाने विकासाच्या बाबतीत मर्यादा दिसून येतात.

**3) केंद्र आणि राज्य यामधील सहकार्य :**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यामधील सहकार्यावर अवलंबून असणार आहे. शैक्षणिक धोरणाचा मसुदा केंद्र शासनाने विविध राज्य सरकारच्या योगदानातून तयार केलेला असला तरी त्याची अंमलबजावणी प्रामुख्याने विविध राज्य सरकारच्या सक्रिय सहभागावर अवलंबून असणार आहे. दक्षिण भारतातील तामिळनाडू राज्याने नवीन शैक्षणिक धोरण 2020 ची अंमलबजावणी न करण्याची भूमिका घेतलेली आहे त्यामुळे केंद्र शासनाकडून कोणता मार्ग अनुसरला जातो यावर नवीन शैक्षणिक धोरणाचे भवितव्य ठरणार आहे.

**4) खाजगी क्षेत्रातील भूमिका :**

नवीन शैक्षणिक धोरणात खाजगी क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे. भारतात उच्च शिक्षण देणाऱ्या जवळ जवळ 70 टक्के खाजगी संस्था आहेत. या खाजगी संस्थेत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देखील जास्त आहे यासाठी खाजगी क्षेत्राची भूमिका महत्वपूर्ण असून खाजगी क्षेत्राचे योगदान मिळविणे हे एक आव्हान आहे.

**5) संसाधनांची गरज :**

नवीन शैक्षणिक धोरणात विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी विविध संसाधनांची गरज भासणार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षणावरील खर्च 6% पर्यंत वाढवावा लागेल. शिक्षणावरील खर्च भागविण्यासाठी अधिकची गुंतवणूक करावी लागेल. विविध संसाधनांची गरज पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार व केंद्र सरकार यांनी आर्थिक गुंतवणूक करणे हे एक मोठे आव्हान असणार आहे.

**6) पायाभूत सुविधांचा अभाव :**

शिक्षणप्रक्रियेत ऑनलाईनवर मोठ्या प्रमाणात भर दिला जात आहे. मात्र विविध राज्यातील दुर्गम भागात, ग्रामीण भागात इंटरनेटची सुविधा उपलब्ध नाही. पायाभूत सुविधांमध्ये डिजिटल क्लासरूम, ऑनलाईन अध्यापन मॉडेल, ई-लर्निंग, प्रयोगशाळेचा अभाव, समान मूल्यमापनाचा अभाव यासारख्या सुविधा सर्व शाळांमध्ये उपलब्ध करून देणे मोठे आव्हान आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

**7) बदल स्वीकारण्याची मानसिकता :**

नवनवीन बदल स्वीकारण्यासाठी माणसे आणि पैसा या गोष्टी महत्त्वाच्या असल्यातरी शिक्षक, विद्यार्थी, पालक, समाज या सर्वांच्या मानसिकतेत बदल घडवून आणावा लागणार आहे हे देखील एक महत्वपूर्ण असे आव्हान दिसून येते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे विद्यार्थ्यांना एकांगी शिक्षणाकडून बहुविध शिक्षणाकडे नेणारे आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आव्हाने असले तरी ती आव्हाने पेलण्याची इच्छाशक्ती असेल तर धोरणांची अंमलबजावणी करणे कठीण काम नाही.भारतातील विविध राज्य सरकारांनी त्यादृष्टीने पाऊले टाकण्यास सुरुवात देखील केली आहे त्यासाठी विविध अभ्यासगट कार्यरत झाले असून बदल होतांना दिसत आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. रवींद्र पी, (2021,डिसेंबर) नवीन शैक्षणिक धोरण: एक प्रतिबिंब, शिक्षण संक्रमण, पृष्ठ क्र. 34 - 41
2. उजगरे उमेश (2022) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, योजना, फेब्रुवारी 2022
3. प्रा .डॉ. भालबा विभुते, राष्ट्रीय शिक्षण धोरण, 2020 मेहता पब्लिशिंग हाऊस प्रा.लि.पुणे,जानेवारी 2020
4. पंकज अरोरा, उषा शर्मा, राष्ट्रीय शिक्षा नीति 2020, रचनात्मक सुधारो की ओर, प्रकाशक क्षिप्रा पब्लिकेशन, मुंबई, जानेवारी 2021
5. वर्धन रवी,(2021) NEP 2020 साठी धोरणात्मक बदल: एक दीर्घकालीन दृष्टिकोन, शैक्षणिक सुधारणा व धोरण
6. नवे शैक्षणिक धोरण 2020 : एक चिकित्सक अभ्यास, संपादक डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, डिसेंबर 2021
7. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 शिक्षण मंत्रालय, भारत सरकार
8. दैनिक महाराष्ट्र टाईम्स् , दैनिक लोकसत्ता, दैनिक लोकमत


Copyright © | JET Network, All Rights Reserved